# महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना बैठकीचे इतिवृत्त दि.०९/१०/२०१९

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | प्रलंबित शालार्थ आय.डी.प्रस्तावांना मान्यता मिळावी. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. सिंधुदुर्ग कार्यालयातील ४९ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता चौकशीबाबत संघटनेकडून काय कार्यवाही झाली याबाबत विचारणा करण्यात आली.<br>सदरहू चौकशी अंतिम टप्प्यात असून चौकशी अहवाल मा. आयुक्त शिक्षण कार्यालयास लवकरच सादर करण्यात येणार आहे.<br>शिक्षण उपसंचालक कार्यालयातील प्रलंबित असणाऱ्या शालार्थ आय.डी. प्रस्तावांबाबत सद्या कार्यवाही सुरु आहे. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | तात्काळ |
| २ | डी.सी.पी.एस. व पी.एफ. च्या पावत्या नियमित मिळत नाहीत. त्या वेळेत मिळाव्यात. | डी.सी.पी.एस. बाबत अधीक्षक, वेतन पथक यांचेकडून लेखे पूर्ण होवून शिक्षण उपसंचलाक कार्यालयाकडे माहिती सादर करण्यात येते. शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून तपासणी होवून डी.सी.पी.एस. स्लिपावर स्वाक्षरी होवून पुनःश्च अधीक्षक, वेतन पथक कार्यालयाकडे वितरणासाठी पाठविल्या जातात.<br>सद्यस्थितीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.सिंधुदुर्ग कार्यालयाची माहिती प्राप्त आहे. उर्वरित कार्यालयाकडून माहिती अद्याप अप्राप्त आहे.<br>पी.एफ. च्या पावत्या ह्या दोन वर्षे उलटून देखील मिळाल्या नसल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले.<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.सिंधुदुर्ग यांनी सन २०१७-१८ व २०१८-१९ मधील पी.एफ. पावत्यांबाबत दि. १५/११/२०१९ अखेर वितरीत होणार असल्याबाबत सांगण्यात आले.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना लेखे पूर्ण करुन तात्काळ पी.एफ. स्लिपांचे वितरणाबाबतची कार्यवाही करण्याच्या लेखी सूचना निर्गमित कराव्यात तसेच डी.सी.पी.एस. बाबतची माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करावी. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | -- |
| ३ | ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षक वैयक्तिक मान्यता वेळेत मिळाव्यात. | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ज्युनिअर कॉलेजच्या काही शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेबाबतचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. तसेच काही अर्धवेळ शिक्षकांच्या मान्यतेबाबतचे देखील प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयात प्रलंबित आहेत. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | उपरोक्त प्रलंबित प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु असल्याबाबत सांगण्यात आले. | | |
| ४ | निवडश्रेणीच्या जाचक अटी रद्द कराण्यासंदर्भात संघटनेची मागणी म्हणून शासनास शिफारस करावी. | संघटनेमार्फत निवेदन सादर करावे. शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून वरिष्ठ कार्यालयास सादर करणेत येईल. तसेच सदरहू बाब धोरणात्मक असल्यामुळे आपल्या राज्यस्तरीय संघटनेच्या बैठकीमध्ये विषय मांडावा. | संघटनास्तरावर | -- |
| ५ | सौ. मृण्मयी अभिजीत जाधव, महात्मा गांधी विद्यालय, तळेबाजार, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग यांना प्रभारी मुख्याध्यापक यांचेकडून होणाऱ्या नाहक त्रासाची चौकशी व्हावी. | सौ. मृण्मयी अभिजीत जाधव, महात्मा गांधी विद्यालय, तळेबाजार, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग यांना प्रभारी मुख्याध्यापक यांचेकडून नाहक त्रासाची दिला जात आहे. वारंवार कारणे दाखवा नोटीस देवून त्रास देण्यात येत असल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले.<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत सदरहू मुख्याध्यापकांना याबाबत सक्त सूचना देण्यात आल्याचे सांगण्यात आले. तसेच याबाबत मुख्याध्यापकडून सुधारणा न झाल्यास त्यांचेकडून कार्यभार काढून घेण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सिंधुदुर्ग यांनी सांगितले. | शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.सिंधुदुर्ग | -- |
| ६ | शिक्षकेतर भरती प्रक्रिया सुरु करणेबाबत शासन स्तरावर प्रयत्न व्हावेत. | शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. आकृतीबंधाबाबत कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर शिक्षकेतर भरती प्रक्रिया सुरु करण्यात येईल. | शासन स्तरावर | -- |
| ७ | सातारा जिल्ह्यातील कलाशिक्षकांना एटीडी टू ए.एम. वेतनवाढ मिळण्याबाबत योग्य मार्गदर्शन व्हावे. | कोल्हापूर विभागातील सातारा जिल्ह्या वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यामध्ये कलाशिक्षकांना एटीडी टू ए.एम. वेतनवाढ मिळालेली आहे. सातारा जिल्ह्यामध्ये साधारणतः १५ कलाशिक्षक सदरहू लाभापासून वंचित राहिलेले आहेत.<br>याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.सातारा यांना नियमानुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देणेत आल्या. | शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.सातारा | -- |
| | **आयत्या वेळचे विषय -** | | | |
| १ | श्री. सौंदत्तीकर, से.नि. मुख्याध्यापक यांचे वैद्यकिय देयकाबाबत | श्री. सौंदत्तीकर, से.नि.मुख्याध्याक यांचे मूळ वैद्यकिय देयक सन २०१५ साली मंजूर होवून शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे प्राप्त झाले. परंतु, सदरहू मूळ प्रस्ताव गहाळ झाल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले.<br>कार्यालयामध्ये सदरहू प्रस्तावाचा शोध घेणे बाबत संबंधीतांना सूचना देण्यात आल्या. | शिक्षण उपसंचालक कार्यालय | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ➢ | **सर्वसाधारण सूचना :-** | | | |
| | संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येईल. | संघटना स्तरावर | -- |

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर